**महाराष्ट्र शासन**

**पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग**

१८ वा मजला, नवीन प्रशासकीय भवन, मंत्रालय, मुंबई - ३२.

---

क्र.आस्थाप-२०२४/प्र.क्र.३३६/आस्थापना | दि. १२ जून, २०२५

**प्रति,**

राज्य सूचना विज्ञान अधिकारी,
राष्ट्रीय सूचना केंद्र,
सामान्य प्रशासन विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२

**विषय:-** १०० दिवसांचा कृती आराखडा कार्यक्रमाची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याबाबत.

**महोदय,**

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाचा १०० दिवसांत घ्यावयाचा कार्यक्रमाची माहिती यासोबत जोडून पाठविण्यात येत आहे. सदर माहिती पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात यावी, ही विनंती.

आपली,

(शाहीन स्वा. शेख)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

D:\Sandeep Jadhav\कार्यालय पत्र.docx

## १०० दिवस कार्यक्रमाची सद्य:स्थिती

| अ. क्र. | मुद्दा | कार्यवाही पूर्ण/अपूर्ण | पूर्ण असल्यास त्याबाबतची माहिती व शासन निर्णय/फोटो इ. अभिलेख किंवा त्याची लिंक | अपूर्ण असल्यास सद्य:स्थिती व कार्यवाही पूर्ण करण्याची कालमर्यादा |
|---|---|---|---|---|
| १ | पर्यावरण विषयक तक्रार नोंदविणे, संबंधितांनी त्यावर कार्यवाही करणे व सदर तक्रारीचे निराकरण करणे यानुषंगाने महापर्यावरण ॲप तयार करणे. | पूर्ण | निविदा प्रक्रिया राबवण्यात आली होती. महापर्यावरण ॲप तयार झाले आहे व दि.०५ जुन, २०२५ पासून नागरिकांच्या वापरासाठी सुरु करण्यात आले आहे.<br><br>पर्यावरण ॲप:- पर्यावरण ॲपच्या अंमलबजावणी आणि देखभालीसाठी निविदा काढण्यात आल्या होत्या. निवडलेल्या बोलीदाराला कामाचे आदेश देण्यात आले आहेत. या ॲपमध्ये नागरिक प्रदूषण झालेल्या ठिकाणचे फोटो किंवा व्हिडीओ अपलोड करण्याची सुविधा असेल. हे ॲप महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाला महाराष्ट्रातील पर्यावरणीय समस्या सोडवण्यासाठी संबंधित नागरिकांशी सहकार्य करण्यास सक्षम करेल व नागरिकांच्या तक्रारीचे निराकरण जलद गतीने होईल. परिणामी प्रदूषण नियंत्रित करण्यास मदतच होईल. | पूर्ण |